# बृहन्मुंबई महानगरपालिका

## विधि खाते

## जाहिरात

क्रमांक एलओ/एलईए/०२१६७० दिनांक १८.०७.२०२३

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विधि खात्याच्या आस्थापनेवरील सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या संवर्गातील खालील तक्यात नमूद केलेली रिक्त पदे भरण्यासाठी निवड यादी तयार करावयाची आहे. त्याकरीता खाली नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छूक उमेदवारांकडून ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता व अटींची पूर्तता करीत असून पात्र आहेत. उमेदवारांनी https://ibpsonline.ibps.in/bmcaloapr23/ या संकेतस्थळावरुन ऑनलाईन अर्ज करावेत. अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा (Valid) ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी असणे आवश्यक आहे आणि भरती प्रक्रिया परिक्षेची प्रवेशपत्रे आणि इतर माहिती Online देण्यात येणार असल्याकारणाने भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी कार्यान्वीत असणे आवश्यक आहे.

**सदर पदावरील नियुक्ती ही महानगरपालिकेने बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्याविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात "महानगरपालिकेच्या वकीलांना न्यायालयामध्ये महानगरपालिकेतर्फे न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी परवानगी देण्याबाबत" दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.८६९४/२०१३ च्या अंतिम निर्णयासापेक्ष तात्पुरत्या स्वरुपात राहील. जर मा.सर्वोच्च न्यायालयाचा आदेश महानगरपालिकेच्या विरुद्ध लागल्यास तो निवड किंवा नियुक्त झालेल्या उमेदवारांवर बंधनकारक राहील व त्यांची सेवा कोणतेही कारण न देता समाप्त करण्यात येईल, याची नोंद अर्ज करणा-या उमेदवारांनी घ्यावी.**

१) **रिक्त पदांचा तपशील:**

(अ) पदाचे नाव- **सहायक कायदा अधिकारी,**

एकूण रिक्त पदे- **३४**

वेतनश्रेणी:- **(M २६: ४७६००-१५११००) अधिक नेहमीचे भत्ते**

**सामाजिक व समांतर आरक्षणाने भरावयाची पदे**

| सामाजिक/ समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | एकूण मागासवर्गीय | अराखीव (खुला) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | - | ०६ | ०२ | १८ | ०६ | २४ |
| महिला ३०% | ०२ | ०१ | - | - | - | - | - | ०२ | ०१ | ०६ | ०३ | ०९ |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ |
| अनाथ १% | - | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | ०१ | | | | | | | | | | | |
| **एकूण** | **०६** | **०३** | **०१** | **०१** | **०१** | **०१** | - | **०८** | **०३** | **२४** | **१०** | **३४** |

★ शासनाच्या दि.२३.०८.२०२१ च्या शासन निर्णयातील निर्देशांनुसार अनाथांना समांतर आरक्षणांतर्गत पद आरक्षित होत नाही.

★ शासन निर्देशानुसार दिव्यांगांसाठी ०१ पद आरक्षित होत आहे.

## दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षण

| संवर्ग | आरक्षण | अपंगत्वाचा प्रकार | | | शारीरिक पात्रता | कामाचा प्रकार/ जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अंधत्व / क्षीणदृष्टी | चलनविषयक विकलांगता | श्रवण शक्तीतील दोष | | |
| सहायक कायदा अधिकारी | ०१ | १<br>(a) B,LV<br>(b) HH<br>(c) OL, OA, BA, BL, OAL, BLOA, BLA, CP, LC, Dw, AAV<br>(d) SLD<br>(e) MD involving (a) to (d) above. | | - | S – Sitting – बसणे<br>ST – Standing – उभे राहणे<br>C – Communication – संवाद साधणे<br>RW – Reading/ Writing – वाचणे/ लिहिणे<br>H – Hearing – ऐकणे<br>MF – Manipulation with Fingers – बोटांनी हाताळणी करणे | 1 महानगरपालिकेचे विधिविषयक काम करणे.<br>2 महानगरपालिकेचे न्यायालयीन कामकाज हाताळणे<br>3 महानगरपालिकेच्या इतर विभागांना विधिविषयक सल्ले देणे.<br>4 महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे |
| अनुशेष | | ०१ | | - | | |

(ब) पदाचे नाव- **सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२)**;

एकूण रिक्त पदे - **१९**

वेतनश्रेणी:- **(M २२: ३८६००-१२२८००) अधिक नेहमीचे भत्ते**

### <u>सामाजिक व समांतर आरक्षणाने भरावयाची पदे</u>

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | एकूण मागासवर्गीय | अराखीव (खुला) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | - | ०३ | ०१ | ११ | ०३ | १४ |
| महिला ३०% | ०१ | ०१ | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०४ | ०१ | ०५ |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ १% | - | | | | | | | | | | | |
| दिव्यांग ४% | ०१ | | | | | | | | | | | |
| **एकूण** | **०३** | **०२** | **०१** | **०१** | **०१** | **०१** | **-** | **०४** | **०२** | **१५** | **०४** | **१९** |

★ शासनाच्या दि.२३.०८.२०२१ च्या शासन निर्णयातील निर्देशांनुसार अनाथांना समांतर आरक्षणांतर्गत पद आरक्षित होत नाही.

★ शासन निर्देशानुसार दिव्यांगांसाठी ०१ पद आरक्षित होत आहे.

## दिव्यांग असलेल्या व्यक्तींसाठी आरक्षण

<table>
<tr><th rowspan="2">संवर्ग</th><th rowspan="2">आरक्षण</th><th colspan="3">अपंगत्वाचा प्रकार</th><th rowspan="2">शारीरिक पात्रता</th><th rowspan="2">कामाचा प्रकार/ जबाबदारी</th></tr>
<tr><th>अंधत्व / क्षीणदृष्टी</th><th>चलनविषयक विकलांगता</th><th>श्रवण शक्तीतील दोष</th></tr>
<tr><td>सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२)</td><td>१</td><td colspan="2">०१<br><br>(a) B,LV<br>(b) HH<br>(c) OL, OA, BA, BL, OAL, BLOA, BLA, CP, LC, Dw, AAV<br>(d) SLD<br>(e) MD involving (a) to (d) above.</td><td>-</td><td>S — Sitting — बसणे<br>ST — Standing — उभे राहणे<br>C — Communication — संवाद साधणे<br>RW — Reading/ Writing — वाचणे/ लिहिणे<br>H — Hearing — ऐकणे<br>MF — Manipulation with Fingers — बोटांनी हाताळणी करणे</td><td>1 महानगरपालिकेचे विधिविषयक काम करणे<br>2 महानगरपालिकेचे न्यायालयीन कामकाज हाताळणे<br>3 महानगरपालिकेच्या इतर विभागांना विधिविषयक सल्ले देणे<br>4 महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे</td></tr>
<tr><td colspan="2">अनुशेष</td><td colspan="2">०१</td><td>-</td><td></td><td></td></tr>
</table>

**<u>टिप:-</u>**

- शासन निर्देशानुसार अनाथांना समांतर आरक्षणांतर्गत पद आरक्षित होत नाही.
- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया अंशतः / पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
- समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे प्रक्रिया राबविली जाईल.
- सहाय्यक कायदा अधिकारी संवर्गासाठी ०१ व सहाय्यक कायदा अधिकारी (श्रेणी-२) संवर्गासाठी ०१ याप्रमाणे दिव्यागांकरिता पदे आरक्षित होत आहेत. तथापि, उपरोक्त नमूद केलेल्या दिव्यांग पदसुनिश्चिती नुसार दिव्यांग प्रकारचे उमेदवार आरक्षित जात प्रवर्गात पदे आरक्षित होत नसली तरी अर्ज करणेसाठी पात्र असतील, असे उमेदवार सर्वसाधारण वर्गातून अर्ज करु शकतात.
- दिव्यांग उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता/ पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या सदर जाहिरातीत पाहून त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे.
- परिपत्रक क्र.एमबीसी/२८६७ दि.११.११.२०२१ सोबत संलग्नित शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दि. ०५.१०.२०२१ अन्वये प्राप्त निर्देशाप्रमाणे, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना सवलती उपलब्ध असतील.
- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील( ईडब्लूएस) उमेदवारांकरिता वित्तिय वर्ष २०२१-२२ करिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो/४०१९/प्र.क्र.३१/१६अ दि.१२ फेब्रुवारी,२०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेली कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

- कोणत्याही उमेदवाराने एकाच पदासाठी एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास त्यामधील अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंद झालेल्या अर्जाची फी जप्त करण्यात येईल.
- भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- अराखीव (खुला) उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

- **<u>सहाय्यक कायदा अधिकारी व सहाय्यक कायदा अधिकारी (श्रेणी-II) या संवर्गासाठी उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज करावेत.</u>**

२) **<u>समांतर आरक्षण</u>** -

अ) महिलांसाठी ३०% प्रमाणे आरक्षित पदे शासन नियमानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ब) उपरोक्त रिक्त पदांपैकी शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. ०१.०७.२०१६ अन्वये शासनमान्य क्रीडा प्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

क) दिव्यांग व्यक्तीसाठीची रिक्त पदे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रकानुसार भरण्यात येतील. दिव्यांग उमेदवारांकरिता ४% आरक्षणानुसार उपलब्ध होणाऱ्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार पदे भरण्यात येतील. दिव्यांगांच्या अनुशेषांतर्गत भरावयाची पदे ही एकूण रिक्त पदात दर्शविण्यात आली आहेत.

**३) <u>वेतनश्रेणी</u> :**

अ) **सहायक कायदा अधिकारी- (M २६: ४७६००-१५११००) अधिक नेहमीचे भत्ते**

ब) **सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२)- (M २२: ३८६००-१२२८००) अधिक नेहमीचे भत्ते**

४) <u>विहीत अर्हता</u> -

**अ) '<u>सहायक कायदा अधिकारी' या पदासाठी अर्हता खालीलप्रमाणे आहे:</u>**

१.उमेदवार अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत नसल्यास, उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२.उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण केलेली असावी.

३.उमेदवार 'महाराष्ट्र', 'महाराष्ट्र व गोवा' बार कौन्सिलचा सनदधारक असावा व ४ वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीत वकील म्हणून 'महाराष्ट्र' किंवा 'महाराष्ट्र व गोवा' बार कौन्सिलकडे नोंद झालेली असावी.

४.उमेदवारास दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या कार्यपद्धतीचे उत्तम ज्ञान व अनुभव आवश्यक आहे.

५.उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

६.उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे 'सी.सी.सी.' (C.C.C) किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने / तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ही परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**ब) '<u>सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२)' या पदासाठी अर्हता खालीलप्रमाणे आहे:</u>**

१.उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण केलेली असावी.

२.उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षेपेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ४३ वर्षेपेक्षा जास्त नसावे.

३.उमेदवार 'महाराष्ट्र', 'महाराष्ट्र व गोवा' बार कौन्सिलचा सनदधारक असावा व ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीत वकील म्हणून 'महाराष्ट्र' किंवा 'महाराष्ट्र व गोवा' बार कौन्सिलकडे नोंद झालेली असावी.

४.उमेदवारास दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या कार्यपद्धतीचे उत्तम ज्ञान व अनुभव आवश्यक आहे.

५.उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

६.उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे 'सी.सी.सी.' (C.C.C) किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' प्रमाणपत्रधारक असावा. तथापि त्याप्रमाणे

नसल्यास प्रचलित धोरणानुसार प्रशासनाने संगणक ज्ञानाबाबतचे विहित प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विशिष्ट कालावधी विहित केलेला असल्यास, सदर कालावधीत संगणक ज्ञानाचे विहित प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक आहे. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने / तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ही परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**५) टक्केवारीची किमान मर्यादा:-**

सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या पदाकरीता अर्ज करण्यासाठी टक्केवारीची किमान मर्यादा खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदाचे नाव | अर्हकारी अर्हता | प्रवर्ग | किमान टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | सहायक कायदा अधिकारी | माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्याची पदवी परीक्षा (एलएल.बी. परीक्षा) | खुला तसेच सर्व मागास प्रवर्गांसाठी | उमेदवार रकाना क्र.३ नुसार सर्व परीक्षांमध्ये उत्तीर्ण असावा. |
| २. | सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) | | | |

**६) वयोमर्यादा - उमेदवाराचे वय दि. ०१.०७.२०२३ रोजी खालील निकषांप्रमाणे असेल.**

१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२ दि. ०३.०३.२०२३ व महानगरपालिका परिपत्रक क्र. एमपीएम/२/२०९९ दि. १३.०३.२०२३ अन्वये या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दि. ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्तीसंदर्भात प्रसिध्द होणाऱ्या सर्व जाहिरातींकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केलेल्या कमाल वयोमार्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देय केल्याने 'सहायक कायदा अधिकारी' या संवर्गासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गाकरीता कमाल ४० वर्षे, मागासवर्गीय उमेदवारांच्या व खेळाडूंच्या बाबतीत कमाल ४५ वर्षे व दिव्यांग उमदेवारांच्या बाबतीत कमाल ४७ वर्षे असावे.

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२ दि. ०३.०३.२०२३ व महानगरपालिका परिपत्रक क्र. एमपीएम/२/२०९९ दि. १३.०३.२०२३ अन्वये या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दि. ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्तीसंदर्भात प्रसिध्द होणाऱ्या सर्व जाहिरातींकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमात विहित केलेल्या कमाल वयोमार्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देय केल्याने 'सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२)' या संवर्गासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गाकरीता कमाल ४० वर्षे, मागासवर्गीय उमेदवारांच्या व खेळाडूंच्या बाबतीत कमाल ४५ वर्षे व दिव्यांग उमदेवारांच्या बाबतीत कमाल ४७ वर्षे असावे.

३) शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता, सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) पदासाठी असलेली वयोमर्यादा ०५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

४) उमेदवार अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत असल्यास त्याच्यासाठी कमाल वयोमर्यादा नाही.

७) <u>निवडीचे निकष (सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या पदांसाठी)</u>

सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या पदांसाठी निवडीचे निकष, व परीक्षेचे स्वरुप व गुण खालीलप्रमाणे राहतील.

१) दि. २७.१२.२०२२ रोजीचे सुधारित परिपत्रक क्र.एमपीआर/११६७ मधील अ.क्र. ७(क) नुसार ऑनलाईन परीक्षेसाठी प्रशासकीय कामकाजासाठी १२० गुण ठेवण्यात येवून व्यावसायिक कामकाजासाठी ८० गुण ठेवण्यात आलेले आहेत. तथापि, सदर दोन्ही संवर्गांचे कामकाज व्यावसायिक दृष्टीने महत्त्वाचे असल्याने प्रशासकीय कामकाजासाठी खालील तक्त्यातील 'अ' नुसार ८० गुण व व्यावसायिक दृष्टीने कर्तव्यसूचीशी निगडीत असल्याने 'ब' नुसार १२० गुण ठेवण्यात येत आहेत. ऑनलाईन परीक्षेमध्ये खालील वस्तुनिष्ठ प्रश्न-पध्दतीचा अंतर्भाव असेल.

| घटक | चाचणी | प्रश्नांची संख्या | गुण | उत्तीर्ण गुण संख्या | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| | **'अ'(घटक १ ते ४)** | | | | |
| १ | **<u>मराठी</u>** | १० | २० | उत्तीर्ण होण्याकरिता एकूण २०० गुणांपैकी ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. | १२० मिनिटे |
| २ | **<u>इंग्रजी</u>** | १० | २० | | |
| ३ | **<u>सामान्य ज्ञान</u>**<br>१. चालू घडामोडी (राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय)<br>२. महानगरपालिका व प्रशासनासंबंधी माहिती<br>३. मुंबई बाबतची माहिती | १० | २० | | |
| ४ | **<u>बौध्दिक क्षमता</u>** | १० | २० | | |
| | **'ब' (घटक ५)** | | | | |
| | **<u>महानगरपालिका प्रशासनाशी संबंधित खालील घटकांवर आधारित प्रश्न:</u>** | | | | |
| | १. मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८ | २५ | ५० | | |
| | २. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६<br>३. मुंबई शहर विकास आराखडा<br>४. भूसंपादन कायदा<br>५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३<br>६. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८<br>७. भारतीय पुरावा अधिनियम, १८७२<br>८. भारतीय दंड संहिता, १८६० | २५ | ५० | | |
| | ९. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५<br>१०. न्यायालयीन कामकाजाबाबतची माहिती | १० | २० | | |
| | **एकूण प्रश / गुण** | **१००** | **२००** | | |

२) सदर पदांसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या सेवाप्रवेश निकषांनुसार विहित केलेल्या अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची परीक्षा केवळ ऑनलाईन पध्दतीने घेतली जाईल.

३) ऑनलाईन परीक्षेमध्ये ४५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळविलेल्या उमेदवारांची गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करताना पुढील निकष विचारात घेतले जातील.

- उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत मिळालेले गुण हे दोन किंवा अधिक उमेदवारांचे समान असल्यास एलएल.बी. (LL.B) प्रमाणपत्रावरील श्रेणी नुसार प्राधान्य क्रम देण्यात येईल.
- दोन किंवा अधिक उमेदवारांची एलएल.बी. (LL.B) प्रमाणपत्रावरील श्रेणी समान असल्यास महाराष्ट्र राज्य बार कौन्सिलची सनद धारण केल्याच्या दिनांकानुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल.
- दोन किंवा अधिक उमेदवारांचा महाराष्ट्र राज्य बार कौन्सिलचा सनद धारण केल्याचा दिनांक समान असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांला प्राधान्यक्रम देण्यात येईल.
- उमेदवाराचे वय समान असल्यास त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४) उपरोक्त निकषांनुसार तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे आवश्यक कागदपत्रांच्या पडताळणी नंतर सामाजिक/समांतर आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय निवडयादी तयार करण्यात येईल. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे विहित कालावधीमध्ये पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव गुणवत्ता यादीतून वगळण्यात येईल.

५) विद्यापीठ/संस्था यांनी अंतिम प्रमाणपत्रामध्ये दिलेला वर्ग/श्रेणी विचारात घेण्यात येईल.

६) माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्याची पदवी परीक्षा (एल.एल.बी. परीक्षा) उत्तीर्ण असेलेले सर्व प्रवर्गातील उमेदवार अर्ज करू शकतील.

७) मौखिक चाचणी (मुलाखत) घेण्यात येणार नाही.

८) मागासवर्गीय उमेदवार असेल तर त्याला खुल्या किंवा तो ज्या जाती प्रवर्गाच्या आरक्षणात मोडत असेल अशा एकाच प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज सादर करता येईल.

९) पात्र ठरलेल्या उमेदवारांची एकत्रित सामाईक गुणवत्ता यादी तयार करून सदर गुणवत्ता यादीमधील उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांचा खुल्या प्रवर्गाच्या पदासाठी विचार करण्यात येईल.

१०) दिव्यांग व्यक्ती उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या खुल्या व मागासप्रवर्गातील सर्व गुणवत्ताधारक उमेदवारांनी दिव्यांगांच्या संबंधित आरक्षित पदांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावा.

८) **<u>ऑन-लाईन अर्ज सादर करण्याची पद्धत -</u>**

१) सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या पदांकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुविधा **दि. २५.०७.२०२३ ते दि. २४.०८.२०२३ पर्यंत** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

२) सहाय्यक कायदा अधिकारी व सहाय्यक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या संवर्गासाठी उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.

३) उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणे आवश्यक आहे.

४) उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चूकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीवर ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण-घेवाण करु नये. **एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ईमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.**

५) ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पद्धतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बॅंकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर मिळणाऱ्या ई-पावतीची (Transaction Successful झाल्यानंतर) प्रत त्वरीत मुद्रण करुन (Print out) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

६) ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता "Click here for new Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती व ई-मेल आयडी नमूद करावा. त्यानंतर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्क्रीनवर दिसेल. उमेदवाराने सदर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्वत:कडे लिहून ठेवावा. तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारांना ई-मेल व एस.एम.एस. द्वारे पाठविण्यात येईल. उमेदवाराला अर्जात काही दुरुस्ती करावयाची असल्यास तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा उपयोग करुन दुरुस्त्या करता येतील.

७) जर उमेदवार एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर भरलेली माहिती "SAVE AND NEXT" या टॅबचा वापर करुन SAVE करता येईल. ऑनलाईन अर्ज SUBMIT करण्यापूर्वी "SAVE AND NEXT" या सुविधेचा वापर करुन भरलेली माहिती तपासून पहावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये दुरुस्ती करावी. अंतिम (SUBMIT) करण्यापूर्वी सर्व माहिती योग्य रितीने भरली असल्याची खात्री करुन घ्यावी.

८) उमेदवाराने स्वत:चे / वडिलांचे / पतीचे नाव तसेच नावांचे स्पेलिंग योग्यरित्या भरणे आवश्यक आहे. सदरची माहिती योग्य पद्धतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

९) उमेदवाराने भरलेली माहिती तपासण्यासाठी व जतन (SAVE) करण्यासाठी "Validate your details" आणि "SAVE AND NEXT" या बटनांचा वापर करावा.

१०) ऑनलाईन अर्ज अंतिम (SUMBIT) करण्यापूर्वी 'Preview' टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा.

११) आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्य रितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "FINAL SUMBIT" बटनवर क्लिक करावे.

१२) "Payment" बटनावर क्लिक करुन परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावे.

१३) त्यानंतर "SUBMIT" बटनावर क्लिक करावे.

१४) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रीतीने भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पद्धतीने भरल्यानंतरच "SUBMIT" बटन क्लिक करावे. एकदा "SUBMIT" बटनावर क्लिक केल्यानंतर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने आवश्यक ती माहिती योग्य पद्धतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१५) ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तदनंतर केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१६) उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.

१७) उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी व परीक्षेचे केंद्र इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१८) उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पद्धतीने रजिस्ट्रर्ड झाल्यानंतर त्याच्या ई-मेल आयडी/भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल किंवा एसएमएसद्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पद्धतीने रजिस्टर्ड झाला नाही असे समजावे.

१९) अपूर्ण अर्ज (उदा.छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले) अवैध ठरविण्यात येतील.

२०) वरील कार्यपद्धती ही अर्ज करण्याची योग्य पद्धत आहे याशिवाय दुसऱ्या पद्धतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

२१) उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी.

२२) उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

२३) **रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपूर्ण अर्जाची प्रत मुद्रण करुन (Printout) स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वतः जबाबदार राहील. त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.**

## ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पद्धत:

१) ऑनलाईन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित करुन उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**परीक्षा शुल्क:**

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवार: **रु. १०००/- (सर्व करासहित)**
मागास / इतर मागासप्रवर्गातील उमेदवार: **रु. ९००/- (सर्व करासहित)**

२) परीक्षा शुल्क इंटरनेट बँकिंग किंवा क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड (RuPay / Vissa / MasterCard / Maestro) किंवा IMPS किंवा कॅश कार्डस किंवा Mobile Wallets द्वारे भरता येईल.

३) ऑनलाईन परीक्षा शुल्काचे Submission केल्यानंतर थोडा वेळ वाट पाहणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परिस्थितीत Back किंवा Refresh बटन दाबू नये.

४) ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते.

५) उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास (Payment Failure) तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डच्या आधारे पुन्हा लॉगीन करावे लागेल. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा यशस्वी न झाल्यास "your online transaction was unsuccessful please register again" असा संदेश दिसेल. अशावेळी उमेदवाराने ऑनलाईन लिंकवर जाऊन पुनःश्च लॉगीन करणे आवश्यक आहे.

६) नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती (E-Receipt) मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची मुद्रण करुन (Printout) काढून ठेवणे आवश्यक आहे.

७) Credit Card द्वारे परीक्षा शुल्क भरताना भारतीय चलनाचीच नोंद करावी.

८) आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊजर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी.

९) उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

## छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना:

### छायाचित्र:

१) उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अपलोड करावे.

२) सदरचे छायाचित्र रंगीत किंवा पांढऱ्या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.

३) कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे. सुर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. फ्लॅश वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.

४) चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे. छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) छायाचित्र 200 x 230 pixels एवढे असावे व त्याचा आकार 20kb ते 50kb इतका असावा. स्कॅन केलेले छायाचित्र हे 50kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी.

### स्वाक्षरी:

१) उमेदवाराने काळ्या शाईच्या पेनाने पांढऱ्या कागदावर स्वाक्षरी करावी.

२) सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.

३) अर्जासोबत अपलोड केलेले स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

४) स्वाक्षरीचा आकार 10kb ते 20kb व त्याचे Dimensions 140 x 160 pixels एवढे असावे. स्वाक्षरीची स्कॅन केलेली ईमेज ही 20kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

## छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याची पद्धत:

१) छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. त्यासाठी स्कॅनरचे Resolution हे 200 डी.पी.आय. (Dots per inch) एवढे असावे.

२) कलर हा True colour व फाईलची साईज ही उपरोक्त प्रमाणे सेट करण्यात यावी.

३) उपरोक्त छायाचित्र व स्वाक्षरीबाबत दिलेल्या सूचनेनुसार छायाचित्र असणे आवश्यक आहे. त्याची फाईल ही JPG or JPEG Format मध्ये असावी.

४) जर मुद्दा क्र.३ नुसार छायाचित्र व स्वाक्षरी नसेल तर स्क्रीनवर Error Message दिसेल.

**छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची पद्धत:**

१) छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी Upload Photograph व Upload Signature या दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उमेदवाराने योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र / स्वाक्षरी असलेली फाईल Select करावी व Upload बटनावर क्लिक करावे.

२) उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पद्धत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही याची नोंद घ्यावी.

३) उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

**परीक्षेचे केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना:**

१) परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.

२) परीक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

३) बृहन्मुंबई महानगरपालिका कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढवणे याचे अधिकार राखून ठेवत आहे.

४) बृहन्मुंबई महानगरपालिका, उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.

५) उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या / तिच्या स्वत:च्या जबाबदारी व स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.

**प्रवेशपत्र डाऊनलोड करणे**

ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर भेट द्यावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल / एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने संबंधित Link वर Click केल्यानंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीताची window स्क्रीनवर दिसेल. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवाराने रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड / जन्म तारखेचा वापर करावा. उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे.

**ओळख पटवणे:**

i) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card)/ पारपत्र (Passport) / वाहनचालक

परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / फोटोसहित आधारकार्ड / बँकेचे फोटोसहितचे पासबुक / महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे अलिकडील वैध ओळखपत्र / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र इ. समवेक्षक / पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

टिप – उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहतांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र / प्रतिज्ञापत्र (Affidavit) यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नांवात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. रेशन कार्ड व ई-आधार कार्ड परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही. सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१) परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र
२) मुळ फोटो ओळखपत्र
३) फोटो ओळखपत्राची छायाप्रत

ii) **<u>परीक्षेला उशिरा येण्याबाबत –</u>** परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. तेव्हा उमेदवारांची ओळख पटवणे / आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परीक्षेसाठी Login करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी परीक्षा स्थळावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**<u>निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही:</u>**

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये.

**परीक्षेच्या वेळात किंवा एकूणच निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवार,**

१) अनुचित प्रकार करणे

किंवा

२) तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे

किंवा

३) परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, उद्धृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा जतन करणे

किंवा

४) स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे

किंवा

५) स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठींबा मिळविणे

६) दळणवळणासाठी भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे. अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह सदर उमेदवारास -

अ) तो ज्या परीक्षेला बसणार आहे त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.

ब) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठरावीक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.

क) जर उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

**<u>इतर महत्वाच्या सुचना:</u>**

१) परीक्षा घेताना काही अडचणी उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे परीक्षा देण्यावर आणि / किंवा परीक्षेचा निकाल तयार होण्यावर परिणाम होऊ शकेल. अशा प्रसंगी उमेदवारांना परीक्षेसाठी इतर केंद्रावर हलविणे किंवा परीक्षा घेणे यासारखे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. ज्या उमेदवारांना अशा प्रकारचा बदल मंजूर नसेल त्या उमेदवारांची उमेदवारी या परीक्षेपुरती रद्द करण्यात येईल.

२) या भरती प्रक्रिये अंतर्गत उद्भवणाऱ्या सर्व बाबींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक असेल. यासंबंधात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा व्यक्तिगत विचारणांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घेतली गेल्यास वेगवेगळ्या सत्रांमधील वापरलेल्या टेस्ट बॅटरीजच्या काठिण्यपातळीत थोडासा फरक असल्यामुळे हा फरक जुळवून घेण्यासाठी मिळालेले गुण समिकृत केले जातील.

४) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

५) शासनाने विविध शासन निर्णयानुसार वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविध सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रक्रियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.

६) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

७) उमेदवाराने सदर पदाच्या अर्हता / अटींनुसार तो सदर पदासाठी पात्र असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

८) सदर नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड याचा उपयोग करुन उमेदवाराला भरलेल्या अर्जाची प्रत (Print out) Online प्राप्त करता येईल. सदर अर्ज उमेदवाराने स्वत: जवळ ठेवावा. पोस्टाने किंवा कुरिअरने पाठवू नये. परीक्षेअंती निवड झालेल्या उमेदवारांनी सदर अर्ज, त्यावर स्वत:चा पासपोर्ट आकाराचा अलिकडे काढलेला फोटो चिकटवून अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी, सर्वसाधारण अट क्र.६ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींसह, नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

९) परीक्षेचे विहीत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने ताबडतोब ऑन-लाईन अर्ज सादर करावा. शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने अर्ज केला नाही तर शुल्क परत देण्याबाबतची उमेदवाराची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.

१०) इतर कोणत्याही पद्धतीने उदाहरणार्थ पोस्टाने / कुरिअरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.

११) अर्जानुसार पात्र असलेल्या उमेदवारांना परिक्षेसाठी प्रवेशपत्र पोस्टाने किंवा कुरिअरने पाठविण्यात येणार नाही. उमेदवाराने नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड वापरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे आणि त्याची प्रत (Printout) काढावी.

१२) उमेदवाराने प्रवेश पत्रावर स्वत:चे अलिकडे काढलेले रंगीत छायाचित्र चिकटविणे आणि परिक्षेच्या वेळेस ते सादर करणे आवश्यक आहे.

१३) ऑन-लाईन परीक्षा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारे मुंबई, ठाणे, पनवेल, पालघर या क्षेत्रात घेण्यात येईल. तथापि आवश्यकतेप्रमाणे परीक्षा स्थळांमध्ये वाढ / बदल करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहतील.

१४) उमेदवारांना परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१५) परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

Online **<u>नोंदणीबाबतचे वेळापत्रक-</u>**

| | | |
|---|---|---|
| ऑन-लाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | | **दि. २५.०७.२०२३ पासून दि. २४.०८.२०२३ पर्यंत** |
| नेट बँकिगद्वारे अर्ज शुल्क जमा करण्याचा कालावधी | | **दि. २५.०७.२०२३ पासून दि. २४.०८.२०२३ पर्यंत** |
| ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | | **बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.** |

**(वरील दिनांकात बदल करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.)**

**<u>सर्वसाधारण अटी-</u>**

१) जाहीरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येएवढी निवड यादी बनविण्यात येईल. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळेस पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अथवा वाढविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. यास्तव उमेदवाराचे नाव निवड यादीत समाविष्ट झाले तरीही सदर पदावर त्याचा, नियुक्तीसाठी कोणताही अधिकार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

२) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष यात बदल होऊ शकतो. यास्तव, प्रत्येक पदाच्या बदल झालेल्या रिक्त पदानुसार सामाजिक / समांतर आरक्षणाचा विचार करून गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे राहतील.

३) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीकरीता यावयाचे असेल तर त्याने / तिने त्याच्या / तिच्या खाते प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र ऑन-लाईन अर्ज सादर करण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

४) उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोड सह) सुस्पष्ट व पुर्ण असावा.

५) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही.

६) उमेदवारांने नियुक्तीपूर्वी खाली नमूद केलेली शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकीत प्रती (२ संच) तपासणीसाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे.

i) उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला/अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

ii) माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एच.एस.सी.) व एलएल.बी. परीक्षा यांच्या गुणपत्रिका (प्रत्येक वर्षाच्या / सत्राच्या) व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे,

गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे.

iii) क्रीडा व इतर प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्र, बार कौन्सिल ऑफ 'महाराष्ट्र', 'महाराष्ट्र व गोवा' चे सदस्य असलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

iv) सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र (Latest Non Creamy-Layer Certificate) नियुक्ती पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापि, मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकडे नियुक्तीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११ प्रक्र/१०६४/ २०११/१६ब दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या संबंधित उमेदवार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकेल. मागासवर्गीयासाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवारांने संबंधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करुन त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

V) परिपत्रक क्र.एमबीसी/४२ दि.०१.०६.२०२३ सोबत संलग्नित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र.महिआ/२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दि. ०४.०५.२०२३ अन्वये खुला प्रवर्ग तसेच अनुसूचित जाती व अनुसूचति जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदांवरील निवडीसाठी दावा करून इच्छिणाऱ्या महिलांनी जाहिरातीच्या अंतिम दिनांकास वैध असलेले नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधरकारक असेल.

VI) उमेदवार सरकारी, निम-सरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास नियोक्त्याचे (Employer) ना-हरकत प्रमाणपत्र.

VII) विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) / नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र (Gazette) सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. तसेच उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रे / प्रमाणपत्रे यामध्ये नावात बदल असल्यास अशावेळी राजपत्र किंवा शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

VIII) जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे सहायक कायदा अधिकारी या पदाकरीता ४ वर्षे व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-II) या पदाकरीता किमान ३ वर्षे अनुभवाबाबतचे प्रमाणपत्र (जरी उमेदवार स्वतंत्रपणे वकीली व्यवसाय करीत असला तरी) सादर करणे आवश्यक आहे.

IX) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत (Employment Exchange Card) कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

X) दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत किमान ४० टक्के दिव्यांगत्व असल्याबाबतचे सक्षम

प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

XI) फोटो असलेले ओळखपत्र उदा.आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र व बार कौन्सिल ओळखपत्र इ. सोबत आणणे आवश्यक आहे.

७) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवारांविरुद्ध फौजदारी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

८) निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराला सदर पदाच्या एका महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल किंवा तशा आशयाचे बंधपत्र (Bond) सादर करावे लागेल. सदर भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास बिनव्याजी परत मिळेल. उमेदवाराने सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुद्धा मनपामध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना, त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

९) निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल.

१०) उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

११) नियुक्त करण्यात येणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती ही महानगरपालिकेने बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्याविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात "महानगरपालिकेच्या वकीलांना न्यायालयामध्ये महानगरपालिकेतर्फे न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी परवानगी देण्याबाबत" दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका (SLP) ८६९४/२०१३ च्या अंतिम निर्णयासापेक्ष तात्पुरत्या स्वरुपात असणार असून पुढील अटी लागू राहतील.

(अ) निवड झालेल्या उमेदवारांमधून ज्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल त्यांना मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ लागू होतील.

(ब) तसेच शासन निर्णय क्र.अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दि.३१.१०.२००५ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम १९५३) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१२) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या

प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

१३) दिव्यांग उमेदवारांसाठी १ पद आरक्षित असुन ते प्रथमत: अंध/अल्पदृष्टी या प्रकारासाठी आरक्षित होत असून सदर प्रकारचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष भरला जाणार नाही.

१४) निवड झालेल्या उमेदवारांविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची / तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

१५) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

१६) शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांकडून किमान ४०% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या दिव्यांग उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे दिव्यांग असलेल्या टक्केवारीची प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी पाठविले जाईल व बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर दिव्यांग उमेदवार सदर पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्ट्या पात्र (Fit) ठरविल्यानंतर त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

१७) निवड झालेला दिव्यांग उमेदवार मागासवर्गीय असल्यास त्यास आरक्षित पदाच्या उपलब्धतेनुसार सामाजिक आरक्षणांतर्गत सामावून घेण्यात येईल.

१८) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु, सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

२०) शासन अधिसूचना दि.२७.०३.२००५ व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि.०१.०७.२००५ अन्वये लहान कुटूंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुद्धा सदरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

२१) तयार केलेली निवड यादी एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत; या दोन्हीपैकी जे आधीच घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य असेल. त्यानंतर ही निवडयादी व्यपगत होईल.

२२) सदर पदांसाठी त्या-त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व करताना राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू असावा. सदर स्पर्धा या संबंधित खेळांच्या भारतीय ऑलिम्पिक संलग्न असलेल्या राष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच उपरोक्त स्पर्धाव्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून राष्ट्रीय स्तरावरील भारतीय ऑलिम्पिक समितीच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राज्य संघातून झालेली असावी. उमेदवारांची निवड ही शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.०१.०७.२०१६ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरूष खेळाडूंमधून भरण्यात येतील.

२३) दिव्यांग उमेदवारांनी नमूद केलेल्या तक्त्यामधील सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) पदाची कर्तव्ये, जबाबदारी व त्यासाठी आवश्यक ती शारीरिक क्षमता व पात्रता यांची नोंद घ्यावी.

२४) काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परीक्षेच्या तारखांमध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२५) उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

२६) उमेदवारांना परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२७) उमेदवाराने परिक्षा केंद्रामध्ये गैरवर्तणूक केली तर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

२८) उमेदवाराने या भरतीप्रक्रिये संदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ (https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn) वेळोवेळी पहावे.

२९) निवड प्रक्रियेत कोणत्याही स्तरावर निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

(अ) परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या उद्भवल्यास त्याचा परिणाम ऑनलाईन परीक्षेवर किंवा निकालावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये परीक्षेस होणारा विलंब, उमेदवारांवर होणारा परिणाम तसेच उमेदवारांना पुन्हा परीक्षा देण्यास लागू नये यासह सर्व बाबींचे निराकरण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न परीक्षा आयोजित करणा-या संस्थेद्वारा करण्यात येईल. तथापि, अशा परिस्थितीमध्ये जे उमेदवार सहकार्य करण्यास इच्छुक नसतील अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेमधून पूर्णत: वगळण्यात येईल.

(ब) भरती प्रक्रियेशी संबंधित सर्व बाबींबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा निर्णय हा अंतिम राहील. तसेच तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील. याबाबत केल्या जाणा-या विचारणा व पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

(क) ऑनलाईन परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रांची क्षमता कमी असल्यास किंवा काही तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास एकापेक्षा जास्त सत्रामध्ये परीक्षा घेतल्या जातील.

(ड) ऑनलाईन परीक्षेदरम्यान उमेदवारांच्या उत्तरांचे विश्लेषण इतर उमेदवारांच्या उत्तरांबरोबर करताना बरोबर/चुकीच्या उत्तरांमध्ये समानता शोधण्याचा प्रयत्न परीक्षा आयोजक संस्थेकडून करण्यात येईल. उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेदरम्यान सामायिकरित्या उत्तरे दिली असल्यास संस्थेकडून अंवलबण्यात आलेल्या विश्लेषणाच्या कार्यपध्दतीमुळे उमेदवारांनी प्राप्त केलेले गुण हे वैध नसल्याचे लक्षात येईल, अशा प्रकरणी उमेदवारांची उमेदवारी रद्द ठरविण्याचा व उमेदवाराचा परीक्षा निकाल रद्द ठरविण्याचा अधिकार परीक्षा आयोजक संस्था स्वत:कडे राखून ठेवत आहे.

इ) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिली किंवा भरती प्रक्रियेचे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याला /तीला निवड प्रक्रिये दरम्यान अपात्र ठरविण्यात येऊन भविष्यात संस्थेच्या कोणत्याही भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच सदर बाब भरती प्रक्रियेनंतर निदर्शनास आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

३०) सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या पदावरील नियुक्ती ही मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.८६९४/२०१३ च्या अंतिम निर्णयासापेक्ष तात्पुरत्या तत्त्वावर असेल.

३१) माजी सैनिकाना गट 'अ' व गट 'ब' मधील सेवेमध्ये वयोमर्यादा सवलत शासन निर्देशानुसार प्रकरणपरत्वे लागू आहे .

**<u>विशेष सुचना -</u>**

१) यापूर्वी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तिला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचे अधिकार दिलेले नाहीत, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

२) सेवायोजन कार्यालय / प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार Online अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

३) ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती व प्रत्यक्ष पडताळणीवेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत आढळल्यास त्याचा / तिचा अर्ज बाद ठरविण्यात येईल.

४) जाहिरातीमध्ये सदरच्या पदासाठी सर्व प्रवर्गाकरिता विहित केलेली गुणांची किमान टक्केवारी प्राप्त न केलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करुन नयेत.

५) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाब आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला / तिला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

६) मध्यस्थ / ठग / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

७) सदर जाहिरात मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवाराने संकेतस्थळ पाहण्यासाठी Internet Explorer versions (7.0' 8.0) Mozilla, Firefox 3.0, अथवा Google Chrome 2.0 तथा वरील आवृत्तीचाच वापर करावा.

८) ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी असल्यास https://cgrs.ibps.in/ ही लिंक **दि. २५.०७.२०२३ पासून** उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध होईल.

**(सही/- दि.१७.०७.२०२३)**
**कायदा अधिकारी**
**विधि खाते**